*महाराष्ट्र शासन वि. सुशांत*
*निशाणी क्र. ३२ लगत*

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – मंगल दिवाकर जामसंडेकर

माझे वय – ३९ वर्षे,

व्यवसाय – खाजगी नोकरी

रा. – सर्जेकोट, मालवण, ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग

**<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती यु.आर.हेरवाडे यांचे मार्फत.</u>**

०१. पोलीसांनी मला दि. २४/०२/२०२१ रोजी धुरीवाडा येथे रुपा कांदळगावकर यांच्या घरी पंचनामा करण्यासाठी बोलविले होते. घटनास्थळ हे रुपा कांदळगावकर यांनी दाखविले होते. सदर घटनास्थळाची पाहणी केली असता घटनास्थळ हे रुपा कांदळगावकर यांच्या घराच्या पाठीमागील बाजूस आहे. सदरचे घटनास्थळ सुशांत करंगुटकर यांच्या घरापासून २० ते २५ फूट अंतरावरती आहे. सदर घटनास्थळावरती माड बागायत व इतर झाडे आहेत. सदरची जमिन सुमारे १० गुंठे आहे. त्यास दगडी बांधकामाचे कंपाउंड आहे. मला घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगता येतील. पुर्वेस – आचरेकर यांचे घर व कंपाउंड, पश्चिमेस – हिदंळेकर टायपिंग सेंटरकडे जाणारा रस्ता, उत्तरेस – सार्वजनिक पायवाट व दक्षिणेस – सुशांत करंगुटकर यांचे घर आहे. आम्ही पोलीसांना ज्या प्रमाणे वस्तुस्थिती सांगितली त्याप्रमाणे पंचनाम्यामध्ये वस्तुस्थिती लिहिली होती. मला आता घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व आदिनाथ बिले यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.पी४/पीडब्ल्यू४</u>** दिली आहे.

सरतपास पूर्ण

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.आर.के.परुळेकर यांचे मार्फत.</u>**

०२. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे पती सुधीर कांदळगावकर यांच्या झेरॉक्स सेंटरमध्ये मी अनेक वर्षापासून कामाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे रुपा

कांदळगावकर व सुधीर कांदळगावकर यांच्याशी नातेसंबंध आहे. साक्षीदार स्वतःहून सांगते की, सुधीर कांदळगावकर हा माझा मावस भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, काल सुधीर कांदळगावकर मला साक्ष काय द्यायची आहे याची तयारी करण्यासाठी दुपारी २.४५ वा. न्यायालय परिसरामध्ये मला आणले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी सुधीर कांदळगावकर व सरकारी वकीलांनी साक्ष काय द्यायची आहे याची काल चर्चा केली होती, त्याप्रमाणे मी आज साक्ष देण्यासाठी न्यायालयात आले आहे.

०३. हे म्हणणे खरे आहे की, मी सुधीर कांदळगावकर व रुपा कांदळगावकर यांची नातेवाईक असल्याने आणि मी सुधीर कांदळगावकर यांच्या झेरॉक्स सेंटरमध्ये अनेक वर्षापासून कामास असल्यामुळे माझे त्यांच्याशी अतिशय चांगले व कौटूंबिक संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे सुधीर व रुपा कांदळगावकर यांच्या घरी नेहमी जाणे येणे असते. पोलीसांनी मला फोन करुन पंचनाम्यासाठी बोलविले होते. कांदळगावकर यांनी माझा नंबर पोलीसांना दिला होता, त्यामुळे पोलीसांनी मला फोन केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सुधीर कांदळगावकर यांनी पोलीसांना मला पंच म्हणून घेण्यासाठी सांगितले होते, त्यामुळे पोलीसांनी मला फोन केला होता. मला पोलीसांनी दुपारी १.०० वा. फोन केला होता, त्यावेळी मी मालवण दिवाणी न्यायालयाशेजारी असणाऱ्या सुधीर कांदळगावकर यांच्या झेरॉक्स सेंटरमध्ये हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, झेरॉक्स सेंटरपासून घटनास्थळी जाण्यासाठी १० मिनिटाचा वेळ लागतो.

०४. हे म्हणणे खरे आहे की, रुपा कांदळगावकर व आरोपी यांच्या घरामधील असणारे अंतर मी मोजले नव्हते. मला मोजणीचे ज्ञान नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी पंचनाम्यामध्ये अंतर व जमिनीचे क्षेत्र लिहिल्यामुळे मी सदरच्या बाबी माझ्या सरतपासामध्ये सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी पंचनाम्यातील मजकूर लिहिला व त्यावर माझ्या सहया घेतल्या.

०५. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला दि. २४/०२/२०२१ रोजी धुरीवाडा येथे रुपा कांदळगावकर यांच्या घरी पंचनामा करण्यासाठी बोलविले होते, घटनास्थळ

हे रुपा कांदळगावकर यांनी दाखविले होते, सदर घटनास्थळाची पाहणी केली असता घटनास्थळ हे रुपा कांदळगावकर यांच्या घराच्या पाठीमागील बाजूस आहे, सदरचे घटनास्थळ सुशांत करंगुटकर यांच्या घरापासून २० ते २५ फूट अंतरावरती आहे, सदर घटनास्थळावरती माड बागायत व इतर झाडे आहेत, सदरची जमिन सुमारे १० गुंठे आहे, त्यास दगडी बांधकामाचे कंपाउंड आहे, मला घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगता येतील, पुर्वेस – आचरेकर यांचे घर व कंपाउंड, पश्चिमेस – हिंदळेकर टायपिंग सेंटरकडे जाणारा रस्ता, उत्तरेस – सार्वजनिक पायवाट व दक्षिणेस – सुशांत करंगुटकर यांचे घर आहे, आम्ही पोलीसांना ज्या प्रमाणे वस्तुस्थिती सांगितली त्याप्रमाणे पंचनाम्यामध्ये वस्तुस्थिती लिहिली होती, त्यावर माझी व आदिनाथ बिले यांची सही आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे व सुधीर कांदळगावकर व रुपा कांदळगावकर यांचे संबंध असल्यामुळे त्यांना सहकार्य करण्यासाठी मी न्यायालयामध्ये साक्ष देण्यासाठी आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्याबाबत व आरोपीच्या हिताबाबत खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : १८/०३/२०२५

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण